GOVERNMENT OF MAHARASHTRA

**State Institute For Administrative Careers (SIAC), Mumbai**

**Hajarimal Somani marg, Opposite Chhatrapati Shivaji Maharaj Terminus,Mumbai**

---

<u>परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाही बाबत :-</u>

१. परीक्षा केंद्रावर उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२. ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पोर्टल वरुन डाऊनलोड करून प्रिंट केलेले मूळ स्वरूपातील प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रवेश नाकारला जाईल,

३. उमेदवारांची तपासणी झडती (Frisking), ओळखपत्र पडताळणी करणे, सूचना देणे इ. स्वरुपाच्या कार्यवाहीसाठी परीक्षा केंद्रावर हॉल तिकीटवर नमुद वेळेच्या नमुद सुचनेप्रमाणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४. परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन विहित वेळेच्या पुरेसे अगोदर आपल्या प्रवेश पत्रावर नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. परीक्षा कक्षामध्ये शेवटच्या प्रवेशासाठी विहित कालेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

६. परीक्षा केंद्राच्या आवारामध्ये पालक, मित्र, नातेवाईक अथवा अन्य यांना प्रवेश अनुज्ञेय नाही.

७. परीक्षेच्या वेळी मदय किंवा मादक अंमली पदार्थाचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारावर उचित कार्यवाही करण्यात येईल, तसेच संबंधित उमेदवाराला या संस्थेच्या पुढील आयोजित केल्या जाणा-या प्रकीयेसाठी प्रतिरोधीत करण्यात येईल.

८ उमेदवाराचे परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, ८ ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणतेही एक छायाचित्र व मजकूर सुस्पष्ट दिसेल असे मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे परीक्षा कक्षामध्ये पाण्याची (पारदर्शक) बाटली, एवढेच साहित्य घेऊन जाण्यास परवानगी असेल.

९. नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासबंधीचा दाखला परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०. परीक्षा कक्षामध्ये फक्त काळ्या/ निळ्या शाईचा पेन वापरता येईल ( जिथे गरज असेल तेथे परीक्षेचे कच्चे काम Rough work प्रश्नपत्रिकेतील मागील पानावर करणे गरजेचे आहे )

११. परवानगी नसलेले अन्य कोणतेही साहित्य (पाऊच, बंग्स, पुस्तक इ.) परीक्षा कक्षामध्ये नेण्यास सक्त मनाई आहे.

१२. स्मार्ट बॉंच, डिजिटल वॉंच, मायक्रोफोन, मोबाईल, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, ब्लूटूथ, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, परिगणक (Calculator) इ. परीक्षा कक्षात स्वतः जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास किंवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. उमेदवाराकडे नमूद कोणत्याही प्रकारची वस्तू आढळून आल्यास संबंधित उमेदवारास या संस्थेच्या आयोजित पुढील सर्व परीक्षा निवडीकरीता प्रतिरोधीत करण्यात येईल. परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साहित्य/साधन यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भात कोणत्याही नुकसानीस शासन SIAC परीक्षाअंमलबजावणी व सनियंत्रण समिती/ सहयोगी संस्था / परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

१४. परीक्षा कालावधी संपल्यानंतर पर्यवेक्षकाच्या परवानगीशिवाय उमेदवाराला स्वतःचे आसन सोडता येणार नाही.

१५. प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रवेशासाठी निर्गमित करण्यात आले असून परीक्षेस प्रवेश दिला म्हणून या संस्थांनी उमेदवारी स्वीकारली, असा अर्थ होत नाही.

Dr. Swati Wavhal<br>
Director, SIAC, Mumbai<br>
Nodal Officer, Common Entrance

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**State Institute For Administrative Careers (SIAC), Mumbai**

**Hajarimal Somani marg, Opposite Chhatrapati Shivaji Maharaj Terminus,Mumbai**

---

* खालील नमुद केलेले प्रकरणी गैरप्रकार समजुन कारवाई करण्यात येईल.

SIAC CET नागरी सेवा पुर्व परीक्षा 2024 साठीच्या अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश परीक्षा (SIAC CET) अनुषगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तीनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार गैरकृत्य समजण्यात येईल

1 अर्थात हेतुपुरस्कृत खोटी माहिती देणे किवा खरी माहिती दडवून ठेवणे किवा त्यात बदल करणे किवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहित पद्धतीने वितरीत न करण्यात आलेले दाखले / कागदपत्रे सादर करणे

2 सामायिक प्रवेश परीक्षा ( SIAC CET) करीला स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम या संस्थांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस उदा. परीक्षा निरीक्षक, पर्यवेक्षक, सेवा पुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी इ. यांना त्रास देणे, धमकावणे अथवा शारीरिक इजा करणे अया तसा प्रयत्न करणे.

3 परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे, इतर उमेदवारांना धमकावणे इत्यादी प्रकारचे गैरवर्तन करणे.

4 परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंदाच्या परिसरातील पायाभूत सुविधा सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधूस करणे अथवा विद्रूप करण्याचा प्रयत्न करणे,

5 तोतयेगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे आणि / अथया कोणत्याही तोतया व्यक्तीची मदत घेणे अथवा मदत घेण्याचा प्रयत्न करणे,

6 एखाद्या विशिष्ट निर्णयासाठी संघटितपणे अथवा असंघटीतपणे कोणत्याही माध्यमातुन शासन /संस्थावर दबाब आणणे अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न करणे,

7 सामायिक प्रवेश परीक्षा (CET) च्या अनुषंगाने मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, आणि समाज माध्यमांद्वारे स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी य सनियंत्रण समितीवर चुकीचे आरोप करणे, अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध निदर्शने, घोषणावाजी करणे यांचा समावेश असेल.

Dr. Swati Wavhal
Director, SIAC, Mumbai
Nodal Officer, Common Entrance